MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## धनंजय मुंडेंच्या बंगल्यावर वाल्मीक कराड आणि पोलिसांची बैठक:खासदार बजरंग सोनवणे यांचा गंभीर आरोप, आरोपीला मदत करणाऱ्यांनाही सहआरोपी करण्याची केली मागणी

बीड - मंत्री धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावर वाल्मीक कराड आणि पोलिस अधिकाऱ्याची बैठक झाली असल्याचा गंभीर आरोप बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केला आहे. या पूर्वी आमदार सुरेश धस यांनी देखील धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावर बैठक झाल्याचा आरोप केला होता. खून प्रकरण आणि खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर ही बैठक झाली असल्याचा आरोप बजरंग सोनवणे यांनी केला आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -११८ | सोमवार दि.१३ जानेवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -118 | MONDAY DT.13 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधलेल्या काही पोलीस कर्मचाऱ्यांची उचलबांगडी कराच!

# एस.पी.साहेब ऐका जनतेच्या हाका!

# शासनाची पगार घेवून आपआपल्या आकांची गुलामी करणाऱ्यांना धडा शिकवा!

## एस पीच्या अगोदर वाल्मीक कराडला सॅल्यूट मारणाऱ्या २८ पोलीस स्टेशनच्या

# पोलीस अधिकारी व त्याचे राईटर बीट अंमलदाराची अदला-बदली करणे गरजेचे!

### डी वाय एस पी व २८ पोलीस स्टेशन च्या पोलीस अधिकारी यांच्यातील माफियांकडून आर्थिक तडजोडीमध्ये हप्ते गोळा करणारे अनेक पोलीस कर्मचारी यांच्यामधील कनेक्शन तपासणी गरजेचे ?




- गेवराई, माजलगाव, केज, बीड, आष्टी, या सर्वच डी वाय एस पी ची काम करण्याची पद्धत म्हणजे वाल्मीक कराडच्या इशाऱ्यावर?
- खून, खंडणीखोर, गुंडाराज, पिक विमा, पतसंस्था घोटाळा, वाळू मटका दारू पत्त्याचे क्लब राजकीय नेते वरदहस्त लाभलेले आरोपी यांना व माफियांवर नियंत्रणासाठी गुन्हेगारांना रोखायचा असेल तर बीड एकूण २८ सह एल सी बी च्या व पोलीस स्टेशन हे बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस स्टेशनच्या दोनशे ते तीनशे पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणे गरजेचे?
- स्थानिक गुन्हे शाखा, विशेष पथक, आर्थिक गुन्हे शाखेसह सर्व पोलीस निरीक्षक, सपोनिची अदलाबदल करा
- बीड जिल्हा पोलीस प्रशासनाचा कारभार सुधारेल; नवनीत गावात यांच्या कार्य काळामध्ये बीड जिल्ह्याची मान अभिमानाने उंचावेल.
- बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वाल्मीक कराड सोबत झालेले फोटो सेशन वादग्रस्त ठरलेले अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.!

पेठ बीड पोलीस ठाण्यापासून सुरुवात करायला हवी पेठ बीड पोलीस ठाण्यातील गेल्या २३- २४ व २४ - २५ चा गुन्हेगारीचा आलेख पाहिला तर सर्वाधिक गुन्हे हे बीड जिल्ह्यामध्ये पेठ बीड पोलीस स्टेशनमध्ये निघण्याची शक्यता? कोणताही मॅटर असो हनुमंत उगले नावाच्या पोलीस कर्मचाऱ्यालाच वसुली का आणि कोणाच्या आशीर्वादाने नवनीत कॉवतानी संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करणे गरजेचे हनुमंत उगले चा फोन कॉलचा डिटेल अभ्यास करणे गरजेचे तर माफीयांशी कनेक्शन आहे. का नाही हे हनुमंत उगलेला समोर बोलवून व फोन कॉल तपासून विचारणे गरजेचे हनुमंत तुकडे अनेक कारणे पोलीस स्टेशन हद्दीतील जनतेला हनुमंत उगले नावाच्या पोलीस कर्मचारी होत असलेला त्रास नवनीत कॉवतानी तपाणे गरजेचे? नराधम बलात्कारातील आरोपींना सोडून देण्याचा ठपका तत्कालीन एसपी नंदकुमार ठाकूर यांनी ठेवून त्यांच्यावरती सिद्ध झाल्यानंतर शिक्षाही देण्यात आलेली आहे हनुमंत उगलेला जर शिक्षा झालेली असेल तर त्या पोलीस स्टेशनला का ठेवतात व कोणासाठी ठेवता वसुली केलेले पैसे नेमके जातात कोणाला?

बीड शहर, पेठ बीड, बीड ग्रामीण, शिवाजीनगर बीड, नेकनुर, पिंपळनेर, वडवणी, धारूर, केज, युसुफ वडगाव, बर्दापूर, अंबाजोगाई ग्रामीण, अंबाजोगाई शहर, परळी शहर, परळी ग्रामीण, परळी संभाजीनगर, शिरसाळा, दिंद्रुड, माजलगाव शहर, माजलगाव ग्रामीण, तलवाडा, गेवराई, चकलांबा, शिरूर, पाटोदा, आष्टी, आबळनेर, अंभोरा, या सर्व पोलीस स्टेशन मधील आर्थिक तडजोडे मध्ये अनेक पोलीस कर्मचारी बाहेर आहेत राजकीय नेत्यांच्या वशिल्याने व वाल्मीक करांच्या वशिल्याने पोलीस अधिकारी पीएसआय एपीआय सह आणि पोलीस कर्मचारी हे स्वतःची बीट मर्जीने घेऊन त्या ठिकाणी वसुली करत आहेत दोन नंबर वाल्यांचे धंद्याची अगोदरही अनेक दैनिकांनी माध्यमाने केलेली असताना मात्र पुन्हा यांना यात पोलीस स्टेशनमध्ये का ठेवायचं असा सवाल नागरिकांतून होत आहे.

पोलीस अधिक्षक कॉवत साहेब, गुन्हेगारांच्या संपर्कात असणाऱ्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांचे कनेक्शन तपासा व बदली करणे गरजेचे...!

बीड ।प्रतिनिधी

नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या पदभार घेण्याच्या अगोदर बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासनाचा धाक उरला नव्हता . पोलीस अधिकाऱ्यावर राजकीय दबाव मोठ्या प्रमाणात अलीकडच्या काळात दिसून येत असल्याने जिल्ह्यात भरदिवसा खून, खून करण्याचा प्रयत्न खंडणीखोर, पतसंस्था घोटाळा, पिक विमा, मटका, गुटखा, वाळू माफिया, भूमाफिया आणि ग्रामध्ये बेजार झालेले जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची मानसिकता पाहता नव्याने पदभार घेतलेले पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्यापुढे मोठे आव्हान दिसून येत आहे. जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गुंडाराज संपविण्यासाठी प्रथम कोणते काम करायचे असेल तर स्थानिक गुन्हे शाखा, विशेष पथक, आर्थिक गुन्हे शाखेसह सर्व पोलीस निरीक्षक, सपोनि यांची अदला बदल करणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण यामध्ये अनेकजण राजकीय पुढाऱ्यांच्या शिफारशीवर पदभार घेतलेले दिसून येत आहेत. त्यामुळे जोपर्यंत या अधिकाऱ्यांमध्ये अदला बदल केली जात नाही. तोपर्यंत जिल्ह्यातला गुन्ह्यातला बाढता आलेख कमी होणार नाही.

महाराष्ट्राच्या वेशीवर बीड जिल्ह्याच्या गुन्ह्यांची लक्तरे वेशीवर टांगली जाऊ लागली आहेत. जो तो बीड जिल्ह्यातील गुन्ह्यांची आणि राजकीय नेत्यांबर आरोप प्रत्यारोप करत आपले तोंडसुख घेत आहेत. त्याचे कारणही तेवढेच आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरण असो की परळीमधौल अनेक खोटे गुन्हे, त्याचबरोबर जीवघेणा हल्ला, गुटखा, मटका वाळू, राख माफिन्यांचा हैदोस, गुन्हेगार उघड माध्याने फिरत असताना पोलीसांवर राजकीय दबावामुळे या गुन्हेगारांना अटकाव करता येत नाही. त्यामुळे गुंडाराज निमर्माण झाले आहे. एवढेच नव्हे तर ज्या जिल्हा प्रशासनाच्या हातातून बंदुका देण्यात आल्या. त्या बंदुका बाळगणारा तो त्यासाठी समर्थ आहे का? याची पोलीस अधिक्षकांनी चौकशी करावी, त्याचबरोबर जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी राजकीय पुढाऱ्यांच्या शिफारशीनुसार पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अधिकाऱ्यांना तातडीने त्या ठिकाणाहून बदलून त्या ठिकाणी दुसरे अधिकारी नियुक्त करणे, त्याचबरोबर जिल्ह्यातील

भरदिवसा खून पतसंस्था घोटाळा पिकविमा मटका गुटका पत्याचे क्लब दारू मुरूम वाळू माफिया आहे राजकीय वरदहस्त लाभलेले म्हणजेच वाल्मीक कराडला परळीला जाऊन सलून अगोदर मारायचा आणि नंतर मारायचा असे काही आपली शिकार करण्यासाठी २४ तास रस्त्यावर आहेत खाजगी वाहनावरती पोलीस नाव टाकायचं आणि रस्त्यावर उभा राहून राजरोजपणे वसुली करायची त्यामुळे पुन्हा एकदा वाल्मीकच राज्य आहे का असा प्रश्न आता बीडच्या जनतेला पडलेला असताना बीड जिल्ह्यातील २८ ठाण्यातील पोलीस अधिकारी, कर्मचारी रात्री अपरात्री ज्या ठिकाणी अवैध वाळू, मुरूम, राख, उपसा करून वाहतूक केली जाते. त्या ठिकाणी हे जाऊन कारवाई करतात याची खातरजमा करावी. त्याचबरोबर वाळू मुरूम माफियाचा पोलिसांवर राजकीय दबाव जिल्ह्यामध्ये अनेक गुन्हेगार उघड माध्याने फिरत आहेत, त्यांच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून जिल्हाबंदी कराठी, त्याचबरोबर विशेष पथक बरखास्त करून थेट एक वेगळे पथक निर्माण करून त्या खंडणीखोर गुंडाराज गुटखा मटका मटका पत्तेचे क्लब अवैध ताडी अनेक माफी यांचे फोन नंबर हे पथकाच्या अधिकारी, कर्मचाऱ्याचे मोबाईल, पोलीस अधिक्षकांना जोडलेले असावे, आणि जाण्या अगोदर प कारवाईच्या वेळी पोलीस अधिक्षकांना सांगून आणि त्यांची सूचना घेतल्याशिवाय कोणतेही पाऊल उचलू, नये, कारण जिल्ह्यात असे अनेक पथके असून हे पथक कोणाच्या सुचनाचे पालन न करता रात्री अपरात्री कुठेही जाऊन कारवाई करण्याचे केवळ तोंड दाखवतात, मात्र कारवाई करत नाहीत. विशेष करून स्था रिथानिक गुन्हे शाखेचा अधिकारी हा थेट पोलिस अधिक्षक एस पी नवनीत कॉवत यांच्याशी थेट जोडणारा असावा आणि त्यांच्या देखरेखीखाली दिवसभराचे किंवा २४ तासाचे कामकाज करावे, असे बदल अपेक्षित आहेत, मात्र सर्यात बदल मोठा म्हणजे अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि विशेष करून जे अधिकारी, अचानक बाहेर जिल्ह्यातून थेट तालुक्याला नियुक्त्या करून घेतल्या त्यांच्या संदर्भात पोलीस अधिक्षकांनी पाऊले उचलावीत.. हवीत विशेष करून वाळू पट्ट्यात असलेले चकलांबा, तलवाडा, येथील पो.नि., सपोनि यांची बदली आवश्यक आहे. त्याचबरोबर बीड जिल्हा पोलीस दलातील डीवायएसपींचा कारभार म्हणजे आलेला दिवस ढकलण्याचे काम म्हटले तर वावगे ठरणार नाही, त्याचबरोबर गेवराईच्या डीवायएसपीच्या देखरेखीखाली असलेले काही कर्मचारी यांचे नियुक्तीचे ठिकाण एकीकडे असते आणि पूर्ण तालुक्यात या कर्मचाऱ्याचा वावर दिसून येतो. त्याचबरोबर जिल्हा बाहतुक शाखेचा प्रमुख वाहतूक सुरळीत करण्याबराबेर जड वाहन शहरात येऊ नये यासाठी व इतर कामे करत नसल्याचे दिसून येतात. मात्र जिल्हा वाहतुक शाखेचा अधिकारी आणि मोजके दोन तीन कर्मधारी थेट वाळू घाटात दिसून येत आहेत. त्याचबराबेर विशेष पथक या पथकाची कारवाई अलीकडच्या काळात फक्त बाळू घाटातच दिसून येते. मात्र मुद्देमाल काही जप्त केला जात नाही. त्यामुळे एकंदरीत जिल्हा पोलीस प्रशासनाची प्रतिमा सुधारण्यासाठी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी तातडीने वरील गोष्टी केल्या तर नक्कीच पोलीस प्रशासन जनतेसाठी कौतुकाचे माध्यम ठरू शकेल अशी चचर्चा होत आहे. यामध्ये बीड एलसीबी सह बीड जिल्ह्यातील २८ पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी पोलीस कर्मचारी बीट अंमलदार व पोलीस अधिकाऱ्यांचे रायटर तसेच बीड एलसीबी चे पीआय सह बीड जिल्ह्यातील विशेष बीड जिल्हा पोलीस दलातील अधिकारी व विविध पथकाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी हे वाल्मीक कराडला बीडचे तत्कालीन पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर व अविनाश बारगळ यांच्या अगोदर वाल्मीक करायला मारून आपल्या आवडीचे पोलीस स्टेशन घेण्यासाठी वाल्मीक करायला मारणाऱ्या भ्रष्ट पोलिसांची सखोल चौकशी होऊन बीड जिल्हा पोलिसांचा चेहरा एकदा नवनिर्वाचित पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे चमकातील अशी अपेक्षा बीड जिल्ह्यातील जनतेला आहे त्यामुळे एसपीच्या अगोदर वाल्मीक करायला सेलोट मारणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची संपर्क चौकशी व आदला बदल गरजेचे आहे.

# बीड शहरातील दोन्ही राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले

## खड्ड्यांमुळे अपघात तर धुळीमुळे आरोग्य धोक्यात; स्थानिक लोकप्रतिनिधींनींच्या दुर्लक्षामुळे थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरींना सामाजिक कार्यकर्त्यांचे साकडे :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातुन जाणा-या बीड ते अहिल्यानगर आणि धुळे ते सोलापूर दोन्ही राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडले असुन जागोजागी खोदलेल्या खड्ड्यांमुळे अपघात तर धुळीमुळे नागरीकांना श्वसनाचे विकार जडले असुन बीडकरांचे आरोग्य धोक्यात आहे.स्थानिक लोकप्रतिनिधींनींचे याकडे दुर्लक्ष असुन वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुधारणा न झाल्याने अखेर आज दि.१३ सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याभोवती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रतिमेची महाआरती करत आपणच या रस्ते कामांकडे लक्ष द्यावे असे साकडं घालत लक्ष्यवेधी आंदोलन केले. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत नितीन गडकरी, प्रकल्प संचालक राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे,रामनाथ खोड, सुदाम तांदळे,शेख मुबीन, शेख मुस्ताक,शिवशर्मा शेलार, बप्पासाहेब पवार , बीड जिल्हाध्यक्ष आप,माजी सैनिक अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष( इंटक) रामधन जमाले , बाळासाहेब मोरे,राहुल कवठेकर,प्रा.पंडीत तुपे, शाहिर आनिल तिवारी, गौतम सोनकांबळे , पांडुरंग हराळे आदी सहभागी झाले होते.




बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ मार्गावरील शिरपूर फाटा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि बार्शी रोड ते जरूड फाटा असा १६० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक असलेल्या २४.५ किलोमीटरचा ९४ फुट रूंदीचा रस्त्याचे काम ३० जुन २०२३ रोजी सुरू करण्यात आले. नगररोडवर महत्वाची शासकीय कार्यालये जिल्हाधिकारी, जिल्हा न्यायालय, तहसिल, सामाजिक न्यायभवन, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग असुन दीड वर्षात केवळ १ किलोमीटरचे काम करण्यात आलेले आहे.रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने असुन जागोजागी खोदलेले खड्डे यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे तर धुळीमुळे शासकीय कार्यालयात येणाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असुन श्वसनाच्या आजारात वाढ झाली आहे.

बीड शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल १८ कोटी रूपयांच्या सिमेंट रस्त्याचे काम करून अडीच वर्षं झाली मात्र साईडपंखे भरलेले नाहीत, नाल्यांची कामे नाहीत तसेच दुभाजकांचे काम अर्धवट असुन सिमेंट रस्त्यावरून येताना जाताना वाहने घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. ते काम पूर्ण करण्यात यावे.

बीड जिल्ह्यातुन जाणारे राष्ट्रीय महामार्ग खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील लोखंडी सावरगाव ते मांजरसुंभा आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील रस्ते काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने रस्त्यावर जागोजागी मोठमोठ्या भेगा पडल्याने दुचाकी वाहनांचे टायर अडकून अपघातात अनेक जण मृत्युमुखी पडलेले आहेत. संबंधित प्रकरणात जबाबदार कंत्राटदार आणि देखभाल करणा-या आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

# आडसमध्ये पिस्टल, चाकू बाळगणाऱ्याला ठोकल्या बेड्या

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

काल दिनांक ११/०१/२०२४ सायंकाळी ०७.०० वा. सुमारास मौज आडस येथे दोन गटात वाद चालु आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन पोलीस ठाणे धारुर येथील पोलीस अधिकरी अंमलदार हे सदर ठिकाणी जावून दोन गटातील वाद शात करण्यात आला. व दोन्ही गटाना पोलीस ठाणे धारुर येथे बोलावुन त्यांना भांडणामध्ये मार लागल्याने वैद्यकिय तपासणी करुन घटनातील जखमी फिर्यादी नामे आकाश विश्वनाथ आकुसकर वय २९ वर्षे व्यवसाय हॉटेल व शेती रा.आडस ता. केज.जि.बीड याचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे धारुर गुरन १५/२०२५ कलम १०९,११८(१), ११५(२),३५२,३५१(२) (३),३(५) भा.न्या.सं.२०२३ सह कलम ३/२५,४/२५ आर्म ऑक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपी नामे १) गौरव




मलिकार्जुन आकुसकर २) संघर्ष शिवदास आकुसकर ३) सोन्या शिवशंकर आकुसकर ४) सुरज भारत पतरवाळे सर्व रा. आडस ता. केज जि.बीड यांना तात्काळ अटक करण्यात आली. तांत्रिक तपास करुन मोबाईल मधील व्हिडोओ क्लीप चा धागा पकडुन सदर गुन्हयातील आरोपी नामे गौरव मलिकार्जुन आकुसकर रा. आडस यांचे कडे असलेलस चाकु व पिस्टल जप्त करण्यात आला. विरोधी गटाचे फिर्यादी नामे संघर्ष शिवदास आकुसकर वय २४ वर्षे रा.आडस ता. केज यांचे फिर्यादी वरुन पोलीस ठाणे धारुर गुरन १६/२०२५ कलम ११८(१), ११५(२),३५२,३५१(२) (३),३(५) भा.न्या.सं.२०२३ प्रमाणे परस्पर विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहते.

सदर ठिकाणी माहिती मिळताच पोलीस सतर्कतेने पोहचल्याने पुढील उचित घटना टळली असुन सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक सो श्री. नवनित कॉवत, मा. अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, मा. सहा. पोलीस अधीक्षक श्री. कतलेश मीना सो, उपविभागीय पोलीस अधिकारी केज यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे. धारुर प्रभारी अधिकारी सपोनि श्री. देविदास वाघमोडे, पोउपनि एस.आर. सर्जे. सफौ/९४७ ए.आर.पांडे, पो.हे.कॉ. १३०५ पुरी, पोना/१८५८ आर.सी.दुधाने, पो.कॉ. १३२५ विशाल मुजमुले, पो.कॉ. १९२० गायसमुद्रे, पो.कॉ. १९३७ शेख हे करीत आहेत, आरोपीतांना अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने त्यांची दिनांक १५/०१/२०२५ पावोतो पोलीस कस्टठी मंजुर केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

# अमेरिका अभ्यास दौरा करून आपल्याबद्दल डॉ. मिलींद आवाड यांचा अनिल राधे कांबळे यांचे वतीने सत्कार

माजलगाव ।प्रतिनिधी

मानवी हक्क अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. डॉ. मिलिंद नाना आवाड हे दिड महिण्यांचा अमेरिकेचा अभ्यास दौरा पूर्ण करून आल्याबद्दल त्यांचा माजलगाव येथे अनिल राधे कांबळे यांचे वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.



यावेळी समाजसेवक तथा उपसरपंच अनिल राधे कांबळे, मानवी हक्क अभियानचे तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, ब्रम्हगावचे सरपंच नारायणराव भले, मानवी हक्क अभियानचे जेष्ठ नेते कचरू कांबळे, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल तुपसौंदर, मानवी हक्क अभियानचे जेष्ठ नेते प्रल्हाद दळवी, मानवी हक्क अभियानचे शहराध्यक्ष संदिप वाघमारे, भाउसाहेब कांबळे, अनिकेत वाघमारे, दादा घडसे, प्रविण कांबळे, सागर कांबळे, सुभाष क्षिरसागर, आदित्य वाघमारे, अभिषेक वाघमारे, गोटु पौळ, युवराज कांबळे, हरी क्षिरसागर, शरद कांबळे, प्रशांत कांबळे, सौरभ कांबळे, किरण कांबळे, धुराजी कांबळे, वरद कांबळे, संग्राम कांबळे, प्रदिप कांबळे, स्वप्नील उमाप, शिवा क्षिरसागर, पवन भिसे यांचेसह अनिल राधे कांबळे मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



# माँ साहेब राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त व आरोग्यदूत बाजीराव दादा चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त १५१ रक्तदात्यांनी केले रक्तदान

बीड ।प्रतिनिधी

येथे आज दिनांक १२ जानेवारी या दिवशी स्वराज्यप्रेरिका मांसाहेब राजमाता जिजाऊ जयंती निमित्त व महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांचे अत्यंत विश्वासू व जवळचे महाराष्ट्राचेआरोग्य दूत मा,बाजीराव(दादा)चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरात राजीव गांधी चौक,मांसाहेब जिजाऊ गार्डन या ठिकाणी १५१ रक्तदात्यांनी केली रक्तदान उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष स्वप्निल वरपे पाटील मित्रपरिवार व निखिल(भाऊ)मस्के,संकेत पवार ,

उदयनराजे सेना बीड जिल्हा अध्यक्ष विजय(राजे)लवाळे,सचिनभैया उबाळे , शिवसेना ठाकरे गट जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर,अविनाश(भाऊ)नाईकवाडे शिवसेना जिल्हाप्रमुख ठाकरे गट गणेश वरेकर ,गणेश शिराळे ,शरद झोडगे ,प्रवीण पालेकर, तुषार(भैय्या)मस्के, ऋषी तुरूकमारे,गोपाल सव्वाशे,धनराज (दादा)बागलाने ,आकाश वाघमोडे ,गोविंद कुटे ,योगेश रसाळ ,दीपक रसाळ ,कृष्णा बनसोडे, ज्ञानेश्वर सपकाळ ,अभी कदम ,अजिंक्य वाघ, रमेश(भैय्या)नाटकर ,कृषी सपकाळ ,ऋषी जोगदंड ,मंगेश जाधव, बाळा बहिरवाळ ,श्याम कोटेकर ,भैय्या जावळे, आदींनी, बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रक्त तुटवडा असल्यामुळे व रुग्णांना मदत होईल यामुळे हा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने युवक तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती ..!

# स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख प्रकरणातील आरोपींना शिक्षा करा परंतु?

## वंजारी समाजास गुन्हेगारीच्या पिंजऱ्यात उभे करू नका-फुलचंद कराड

परळी ।प्रतिनिधी

दि.१३ मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करा.परंतु या घटनेच्या अडून दोन जातीमध्ये वाद लावण्याचे कारस्थान रचले जात आहे.वंजारी समाजाला गुन्हेगारीच्या पिंजऱ्यात उभे करू नका.या प्रकरणाच्या अडून ओबीसी व वंजारी जातीवर जर कोनी बोलले तर हे चालणार नसल्याचा इशारा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद राव कराड यांनी पत्रकार परिषदेत सामाजिक सघटना याचा सालोख्यासाठी सर्व संघटना. प्रमुख नेत्यांशी बोलणार असल्याचे सांगितले .सध्या राज्यात गाजत असलेल्या मसाजोग येथील संतोष देशमुख खून प्रकरणावरून राजकारण केले असल्याने याबाबत भगवान सेनेचे सर सेनापती फुलचंद राव मनाली की. या प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा द्या.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्या.परंतु असे होताना दिसत नाही.



कारण हे प्रकरण वेगळ्या कारणासाठी आलेले असून काहीजण मराठा - वंजारी असा वाद घालण्यास गुंतले आहे.आमदार सुरेश धस यांना मोठे करण्यात दैवत आदरणीय मुंडे साहेब व पंडितांना यांचा सिंहाचा वाटा आहे.तुम्हाला नेहमी वंजारी सह ओबीसी समाजाने निवडणूकी सह इतर वेळी साथ दिलेली आहे. परळी तालुक्यातील सह बीड जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये वंजारी मराठा व ओबीसी गुण्या गोविंदाने नांदत आहेत. देशमुख प्रकरणाबाबत विधानसभेत आवाज उठवायला हवा.केवळ आक्का. बोका मुन्नी असे विचित्र बोलत आहात. आमदार.सुरेश धस आपण कराड आडनाव परळी शहर. वंजारी समाज. ओबीसी यांना या प्रकरणात जोडू नका. कारण परळी हे ज्योतिर्लिंगाचे क्षेत्र असल्याने येणाऱ्या भाविकांवर परिणाम होत आहे.जरांगे पाटील तरी मराठा आरक्षण लढत आहेत.मीही वंजारी समाजाच्या एन. टी. २% आरक्षणाबाबत लढतोय. मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणासाठी लढा देत आहेत.भगवान सेनेने ही मराठा आरक्षणासाठी वेळोवेळी पाठिंबा दिला आहे.ओबीसी व वंजारी या जातीवर कोणी बोलत असतील तर झोपून घेणार नसल्याचा इशारा फुलचंद राव कराड यांनी या पत्रकार परिषदेतुन दिला.यावेळी पाटलाला मुंडे माऊली फड. भाऊसाहेब डिगोळे रवी कराड यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.सर्व पुढाऱ्यांनी बीडला बैठक घ्यावी.

### बीड जिल्ह्यात मराठा-वंजारी समाज गुण्यागोविंदाने राहतो. परळी पॅटर्नच्या नावाखाली विनाकारण सर्वांना बदनाम करू नका

मसाजोग प्रकरणावरून काही जण परळी पॅटर्न म्हणत आहेत. यामुळे तमाम परळीकरांची बदनामी होत आहे. आरोपीचे नाव घ्या व त्यांना जे काय करायचे ते करा.या प्रकरणावरून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्यांचे षडयंत्र हाणून पाडण्यासाठी प्रमुख नेत्यांनी बीड येथे बैठक घ्यावी.यासाठी आपण सर्वप्रमुख नेत्यांची भेट लवकरच घेणार असल्याचे फुलचंद राव कराड यांनी सांगितले.बीड जिल्ह्यात मराठा- वंजारी समाज गुण्या गोविंदाने राहतात.बीड जिल्ह्यात मराठा - वंजारी समाज आणि राहतो बीड जिल्ह्यात कधीही मराठा विरुद्ध वंजारी अशी दंगल झाली का?निवडणुकीत आरोप प्रत्यारोप होत असतात. निवडणूक आली की सर्वांनी नको त्याने करायचे असते परंतु काही जण आपली राजकीय पोळी काढण्यासाठी जाणीवपूर्वक राजकारण करीत आहे व मराठा विरुद्ध वंजारी असा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.परंतु भगवान सेना आहे षडयंत्र आणून काढणार असल्याचे भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यावेळी म्हणाले.

# रुग्णांच्या जीवनात आशावाद निर्माण करणारा 'आशेच्या कथा ' हा प्रभावी उपक्रम मुंबई मध्ये आयोजित

मुंबई ।प्रतिनिधी

इंटास फाउंडेशनच्या आपलं घर, चेंबूर, मुंबई येथे आज 'आशेच्या कथा ' या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे रुग्णांना त्यांच्या जीवनातील संघर्ष व आशावादाच्या कहाण्या मांडण्याची संधी मिळाली, ज्यातून सर्व उपस्थितांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमासाठी प्रमुख म्हणून अक्षता कांबळे, कल्पेश यमनेरे आणि विशाल लोखंडे उपस्थित होते. त्यांनी रुग्णांशी संवाद साधत, जीवनाच्या कठीण काळात कसे धैर्य आणि संयम राखावे, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच जीवनातील आव्हानांना कसे सामोरे जावे आणि मानसिक व शारीरिक खंबीरता कशी वाढवावी, याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.ध्यान साधना व स्थिरता यातून ही शांतता मिळणाऱ्या बाबीवर चर्चा झाली.

कार्यक्रमाची सुरुवात रुग्णांनी आपापल्या संघर्षमय अनुभवांच्या कथनाने झाली. अनेक रुग्णांनी कर्करोगाशी झुंज देताना आलेले अनुभव उलगडले. काही रुग्णांनी आपल्या आजारपणाशी केलेल्या लढाईचा प्रवास सांगताना, कुटुंबीयांचा संस्थाचा उभं राहिलेल्या व्यक्तींचा आणि डॉक्टरांचा पाठिंबा त्यांच्या प्रवासात किती महत्त्वाचा होता, हे सांगितले. या प्रेरणादायी कथामुळे इतर रुग्णांमध्येही नवी आशा आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

प्रकल्प सहाय्यक अमित घायाळ यांनी या प्रसंगी आपले विचार मांडले. त्यांनी रुग्णांशी मनमोकळ्या संवादात सांगितले की, रुग्णांच्या चेहऱ्यावरील हसू हीच आमच्यासाठी मोठी प्रेरणा आहे. आमच्या संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या मदतीमुळे रुग्णांना त्यांच्या आजारपणात धैर्याने तोंड देण्याची आणि त्यातून सकारात्मक बदल अनुभवण्याची संधी मिळते. अमित घायाळ यांनी पुढे असेही सांगितले की, इंटास फाउंडेशनच्या मदतीमुळे रुग्णांना मानसिक आधार मिळतो आणि त्यांच्या पुनर्वसन प्रक्रियेला हातभार लागतो.



कार्यक्रमाच्या शेवटी, रुग्णांनी एकमेकांशी संवाद साधून एकमेकांना धीर दिला. 'आशेच्या कथा ' या उपक्रमामुळे रुग्णांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि त्यांनी आपले मानसिक व शारीरिक आरोग्य सुधारण्याचा नवा आत्मविश्वास मिळवला.इंटास फाउंडेशनचे आपलं घर दररोज रुग्णांसाठी विविध उपक्रम आयोजित करते, ज्यातून त्यांना मानसिक, शारीरिक व भावनिक आधार मिळतो. 'आशेच्या कथा ' हा उपक्रम त्याच पाठिंब्याचा एक भाग आहे, ज्यामुळे रुग्णांना त्यांच्या कठीण प्रवासात धैर्य आणि आशावाद मिळवून देण्यात यश आले आहे.

## सांय.दै. महाराष्ट्र आरंभ चा दणका

# सरकारी मुरुम विकणाऱ्या गुत्तेदाराला ३२ लाखांचा दंड

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**सायंकाळ दैनिक महाराष्ट्र आरंभ ने तालुक्यातील केसापुरी कॅम्प येथे दीड वर्षांपासून उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरू आहे. या रुग्णालयाच्या पाठीमागील भागातून मोठ्या प्रमाणात खोदकाम करून संबंधित गुत्तेदाराने तेथील ५०० ब्रास मुरमाची विनापरवाना विक्री केल्याचे उघड झाले होते. याची बातमी महाराष्ट्र आरंभ छापली आणि तहसीलदार यांना जाग आली त्यामुळे गुत्तेदाराला ३२ लाख रुपये दंडाची नोटीस महसूल विभागाने बजावली आहे.**




माजलगावपासून जवळ असलेल्या केसापुरी शिवारात उपजिल्हा रुग्णालयाचे काम सुरू आहे. सध्या या रुग्णालयाचे काम निम्मे झाले आहे. चालू असलेल्या कामावरून मुरूम नेल्याचे पंचनाम्यातून उघड झाले संबंधित गुत्तेदाराने चालू असलेल्या कामाच्या ठिकाणाहून खोदकाम करून ५०० ब्रास मुरूम नेल्याचे पंचनाम्यातून उघड झाले. यामुळे संबंधित गुतेदाराला ३२ लाख रुपये दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

संतोष रुईकर, तहसीलदार, माजलगाव

कामाच्या पाठीमागील बाजूला काम सुरु करण्यापूर्वी येथे जेसीबीद्वारे मोठ्या प्रमाणात खोदकाम करण्यात आले. या ठिकाणी निघालेला मुरुम महसूल विभागाची कसल्याच प्रकारची परवानगी न घेता बिनबोभाटपणे तीन दिवसापासून विक्री करण्यात आला होता. याबाचतची तक्रार या भागातील नागरिकांनी केल्यानंतर तहसीलदारांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले होते.

### तहसीलदारांनी बजावली नोटीस : ५०० ब्रास मुरूमाची विनापरवाना विक्री

मंडळ अधिकारी के, सी. पुराणिक व तलाठी आर. एन. थापडे यांनी घटनेचा पंचनामा केला. या ठिकाणाहून ५०० ब्रास मुरूम गेल्याचे पंचनाम्यात उघड झाले. पंचनाम्यावरून तहसीलदार संतोष रुईकर यांनी सोमवारी संबंधित गुतेदाराला मुरूम चोरीप्रकरणी ३२ लाख रुपये दंड आकारून नोटीस बजावली आहे. या नोटिसीमुळे संबंधित गुत्तेदाराचे धाबे दणाणले आहे.

# अरफात खान यांची मौलाना आझाद युवा मंचच्या मराठवाडा अध्यक्षपदी निवड



बीड ।प्रतिनिधी

मौलाना आझाद युवा मंच चे अरफात खान यांनी बीडच्या जिल्हाध्यक्ष पदावर केलेल्या उत्कृष्ट कामामुळे त्यांना मंच चे संस्थापक अध्यक्ष शेख खलील अहेमद यांनी पदोन्नती देऊन मराठवाडा अध्यक्ष पद दिले असून आता त्यांनी मराठवाडा विभागीय पातळीवर सुद्धा आपल्या उत्कृष्ट कामगिरीने छाप पाडावी अशा अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.

या निमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफिक भाऊ, माजी नगरसेवक मुखीद लाला, युवा नेते आरिफ खान यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांना मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदाचे निवड पत्र देण्यात आले. यावेळी बोलताना सर्व मान्यवरांनी त्यांच्याकडून जसे जिल्हाध्यक्ष पदावर काम करण्यात आले आता मराठवाडा विभागीय पदावर पदोन्नती झाल्याने यापेक्षा जास्त काम त्यांना करावे लागेल. स्वतःसह मौलाना आझाद युवा मंचचे नाव आणि कार्य ही समाजात पोहोचवावे लागेल. अशा अपेक्षा व्यक्त केल्या. यावेळी मंचचे संस्थापक अध्यक्ष शेख खलील, सायं. दैनिक किसान चे संपादक शेख कामरान, कार्यकारी संपादक अदनान खान, पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, शेख अशफाक, मुन्ना भाई, शेख अयाज, मौलाना आझाद युवा मंचचे शहराध्यक्ष सय्यद सलमान, बीड तालुकाध्यक्ष काझी मुहीब उर रहेमान, लियाकत शेख, शेख अख्तर पेंटर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# शेख साद चित्रकला स्पर्धेत पहिला




कडा ।प्रतिनिधी

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आष्टी या संस्थेने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा २०२५,आयोजित केली होती. या चित्रकला स्पर्धेत पहिला क्रमांक शेख साद साजेद (आष्टी) या विद्यार्थ्यांने मिळवला. आज दि.१२ जानेवारी २०२५ रोजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आष्टी मार्फत राष्ट्रीय युवा दिनानिमित्त उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात तहसिलदार वैशाली पाटील व प्राचार्य जी.बी.हडतगुणे यांच्या हस्ते शेख साद साजेद या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी प्रभारी गटनिदेशक नागरगोजे मॅडम, महात्मा गांधी विद्यालयाचे मुख्याध्यापक जावेद पठाण सर,सर्व निदेशक,पालक,विद्यार्थिनी,विद्यार्थी उपस्थित होते.

# अँड.शहादेव जानू भंडारे यांची नोटरी साठी निवड



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा न्यायालयात परिसरात वकिलीचा व्यवसाय करणारे अँड.शहादेव जानू भंडारे यांना नोटरी करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. अँड.शहादेव जानू भंडारे हे गेल्या १५ वर्षापासून बीड जिल्हा न्यायालय येथे वकिली क्षेत्रात कार्यरत आहे. त्यांना भारत सरकारने नोटरी करण्याचा अधिकार बहाल केला आहे. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे. त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन अभिनंदन केले आहे.




**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

**अयोध्येत श्रीराम जन्मभूमीच्या जागेवर भव्य मंदिर प्रतिष्ठापना करण्यात आली त्याच्या वर्धापन दिनाचा आनंद साजरा करण्यात आला. अंबाजोगाई शहरात अनेक ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहराच्या देशपांडे गल्लीतील रणझुंजार बाजीप्रभु देशपांडे चौकाला आकर्षक फुलांनी सजविण्यात आले होते. अयोध्येतील राममूर्ती प्रतिष्ठापना वर्धापन दिनानिमित्त प्रभु रामचंद्रांच्या प्रतिमेचे पुजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. राम मंदीर प्रतिष्ठापना दिनाचा आनंद साजरा केला. आयोजक सागर दिक्षित यांनी प्रास्तविक केले. यावेळी नागरिक उपस्थित होते.**

# ठरलं! दि.१ ते ९ फेब्रुवारी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धा

## शिवसेना जिल्हाप्रमुख जगताप, मुळूक, गलधर यांच्या हस्ते चंपावती महोत्सवाचे पोस्टर विमोचन!

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या कलाक्षेत्रातील मानबिंदू ठरलेला चंपावती महोत्सव बाल कलाकारांनी आपल्या अद्भुत कलाविष्काराने एका विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवला आहे. गत दोन वर्षांच्या अफाट यशानंतर जिल्ह्याभरातील अनेक शाळांचे संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक, पालक बालकलाकार आणि कलाप्रेमींच्या खास आग्रहास्तव याहिवर्षी महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १ फेब्रुवारी २०२४ ते दि. ८ फेब्रुवारी २०२४ या दरम्यान आठ दिवासीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे पोस्टर विमोचन काल दि. १२ जानेवारी २०२४ रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यादरम्यान चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे मार्गदर्शक शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांचा आभारपूर्वक सत्कार केला. पोस्टर विमोचनाच्या कार्यक्रमानंतर महोत्सवाची नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत बीड शिवसेनेच्या तिन्ही जिल्हाप्रमुखांनी मिळून महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या. याबरोबरच जिल्ह्यातून येणाऱ्या सर्व बाल कलाकारांची गैरसोय होऊ नये यासाठी सूचना मार्गदर्शन केले. याप्रसंगी बीड शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शिवसैनिक यांच्यासह चंपावती महोत्सवाचे व्यवस्थापक कलावंत लक्ष्मीकांत दोडके व अनिकेत कांबळे उपस्थित होते. यावर्षी चंपावती महोत्सवामध्ये समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, फॅमिली नृत्य, एकपात्री अभिनय, समूह गीत गायन, वैयक्तिक गीत गायन, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व




स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या सर्व स्पर्धाइयत्ता पाहिली ते तिसरी, इयत्ता चौथी ते सहावी आणि इयत्ता सातवी ते दहावी या वयोगटात होणार असून प्रत्येक स्पर्धा प्रकरातील प्रत्येक वयोगटात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ तीन पारितोषिके काढण्यात येणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना शिल्ड आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत तर सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. या महोत्सवात जी शाळा बक्षीसांची सर्वोच्च संख्या प्राप्त करेल त्या शाळेस मान्यवरांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट शाळा (इर्शी लिहेश्र ष ींहश ूशरी लहरा-ळिपीहळ) उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे महाकरंडक बहाल करण्यात येणार आहे. याबरोबरच

उत्कृष्ट नृत्य शिक्षक, उत्कृष्ट संगीत शिक्षक, उत्कृष्ट चित्रकला शिक्षक, उत्कृष्ट नाट्य शिक्षक, उत्कृष्ट प्राचार्य तथा उत्कृष्ट उपक्रमशील शिक्षक अशी विशेष पारितोषिक देण्यात येणार आहेत. बीडच्या कलाक्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कलाकारांना चंपावती सन्मान या पुरस्काराचे देखील वितरण करण्यात येणार असल्याची माहिती चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.



# भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ऑफिसमध्ये कडा येथे राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती साजरी

आष्टी ।प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ऑफिस मध्ये कडा येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते ठकाराम दादा दुधाबडे हे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की राजमाता जिजाऊंचे हिंदवी स्वराज्य स्थापणेत मोठे योगदान आहे. जिजाऊंनी स्वराज्यासाठी दोन छत्रपती दिले त्यांनी त्यावेळी राजमाता जिजाऊंच्या बालपणापासून ते अस्ता पर्यंत त्यांचे चरित्र उभे करतांना आजच्या प्रत्येक महिलांनी स्वतः जिजाऊ व्हावे व मुलींना जिजाऊ घडवावे असा मोलाचा संदेश दिला. त्याचबरोबर स्वामी विवेकानंद यांचे जीवन व कार्य याविषयावर विवेचन केले व युवकांनी त्यांच्या आदर्श घेतला पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी मा.जिल्हा परिषद सदस्य तथा काँग्रेस तालुकाध्यक्ष रवि काका ढोबळे, पत्रकार किरण जावळे, सामाजिक कार्यकर्ते ठकाराम दादा दुधावडे, गणेश गुंजाळ,आदी उपस्थित होते.

# साई गुणगौरव पुरस्काराने दीपक गरुड सन्मानित

आष्टी ।प्रतिनिधी

अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात करत असलेल्या कामाची दखल घेत शिर्डी येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते आष्टी तालुक्यातील कडा येथील दीपक साहेबा गरुड यांना साई गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले गरीब वंचित घटकातील लोकांचे अडचणी सोडवणे शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विविध योजनांची माहिती देत आपले कार्य करत आहे त्यांच्या कार्याची दखल घेत शिर्डी येथे सुदाम संसारे, सिने अभिनेत्री वंदना गव्हाणे, सिने अभिनेत्री चित्रा दीक्षित, यांच्या हस्ते साई गुन गौरव पुरस्कार देऊन गरुड यांना सन्मानित करण्यात आले त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल राजकीय सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्ष होत आहे



# गेवराई चे शिल्पकार मनोज राठोड यांना राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरव

धर्मगुरु तपस्वी ड्रॉ.रामराव महाराज बंजारा समाज विकास फेडरेशन भारत.या राष्ट्रीय संस्थेच्या वतीने बंजारा समाजातील सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक, कला,क्रीडा, अशा वेगवेगळ्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीला दरवर्षी राष्ट्रीय स्तरावरील सर्वोच्च पुरस्कार राष्ट्रसंत डॉ.रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केला जातो... या वर्षी २९ राज्यातून एकूण २१ बंजारा रत्न पुरस्काराचे मानकरी यांची निवड करण्यात आली, त्यात महाराष्ट्राला एकूण ३ पुरस्कार जाहीर झाले. त्यात गेवराई चे परिचित प्रसिद्ध शिल्पकार




मनोज राठोड यांची निवड करण्यात आली, यांची शिल्पकला क्षेत्रातील उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले आहे.नुकताच महानायक वसंतरावजी नाईक प्रेरणा पुरस्कारणे त्यांना गौरविण्यात आले होते. या कार्याची दखल घेऊन त्यांची राष्ट्रसंत डॉ. रामराव महाराज राष्ट्रीय गोर बंजारा रत्न पुरस्कार २०२५ या पुरस्कारासाठी निवड झाली.तसेच विध्यार्थी जीवनात शिल्पकार मनोज राठोड यांना अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे . दिनांक ११ /०१/ २०२५ रोजी वार शनिवार जगातील बंजारा समाजाची काशी गोरधर्म पीठ पोहरादेवी, या पवित्र ठिकाणी बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज पोहरागड पिठाचे जागतिक धर्मगुरू डॉ. बाबूसिंग महाराज ( विधान परिषद सदस्य महाराष्ट्र राज्य ), गोरबंजारा धर्मपिठाचे महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत कबीरदास महाराज व देशातील सर्व महंत यांच्या उपस्थितीत श्री शिल्पकार मनोज राठोड यांचा पत्नीसह शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.... यावेळी राष्ट्रीय संस्थेचे प्रमुख श्री विजय नायक राठोड त्यांनी कार्यक्रमाच्या प्रस्ताविकास २९ राज्य मध्ये गोर बंजारा बांधवांच्या प्रगती बाबत माहिती दिली. बंजारा बांधवांना एका ठिकाणी जोडण्याचे काम ही संस्था करत आहे सत्कारमूर्तीचे अभिनंदन केले.

शिल्पकार मनोज राठोड यांना राष्टीय गोर बंजारा रत्न पुरस्कार मिळाल्या बद्धल वेगवेगळ्या स्तरावर त्यांचा कौतुक व शुभेच्छा चा वर्षाव होत आहे

## डिजिटल मीडिया परिषदेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहभागी व्हावे - प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

### सेलु येथे पुरस्कार वितरण सोहळा

पुणे/प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि भव्य राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन येत्या १ फेब्रुवारी २०२५ रोजी सेलू या ठिकाणी करण्यात आले असून या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा व तालुका पदाधिकारी आणि सदस्यांनी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.



मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार व परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर सह राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेच्या वतीने प्रत्येक वर्षी महाराष्ट्र राज्यातील आदर्श जिल्हा व तालुका पत्रकार संघांना यथोचित सन्मान करून राज्यातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने गौरविले जाते. या वर्षी देखील परभणी जिल्ह्यातल्या सेलू या तालुका ठिकाणच्या शहरामध्ये हा भव्य सोहळा येत्या एक १ फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त माननीय श्री.एस.एम. देशमुख यांनी काही दिवसांपूर्वीच या ठिकाणी भेट देऊन सेलु पत्रकार संघाची बैठक घेत पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. या आढावा बैठकीसाठी आम्ही स्वतः उपस्थित होतो. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय मेळावा फक्त एक दिवसाचा असणार आहे. राज्यभरातुन मुक्कामी येणाऱ्या पत्रकार बांधवांच्या निवासस्थानाची व भोजनाची व्यवस्था सेलु तालुका पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेली ही डिजिटल मिडिया परिषद आहे. महाराष्ट्र राज्यातील डिजिटल मिडिया परिषदेच्या जिल्हा आणि तालुका पदाधिकारी व सदस्यांनी या मेळाव्यात सहभागी होणे बंधनकारक आहे. डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे,उपाध्यक्ष

अनिल उंबरकर, प्रदेश सदस्य अनिल धुपदाळे कोल्हापूर ,प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाठ बीड मराठवाडा,प्रदेश सदस्य तानाजी जाधव सांगली, प्रदेश सदस्य मल्हार पवार कर्जत रायगड, प्रदेश सदस्य शेख अफताब अहिल्याबाईनगर या सर्व राज्यस्तरीय पदाधिकारी यांनी जबाबदारी घ्यावी.आपणास व इतर पदाधिकारी यांचे काही म्हणणे असल्यास आम्हाला ९८२२५४८६९६ या मोबाईल नंबर वर संपर्क साधावा असे आवाहनही डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी केले आहे.

## पिंपळगाव चे अक्षय गवळी समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

दिंद्रुड ।प्रतिनिधी

पनवेल येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल महाविद्यालयाने माजलगाव तालुक्यातील पिंपळगाव येथील अक्षय गवळी हे ग्रामपंचायत सदस्य व मानवी हक्क अभियान चे युवा कार्यकर्ते आहेत. यांना समाजभूषण पुरस्काराने शनिवारी सन्मानित केले.ग्रामीण भागातील तरुणाचा हा सन्मान कौतुकास्पद आहे.



पिंपळगाव येथील अक्षय गवळी हे छ.शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारधारेला प्रेरित होऊन सर्व समाजाची बांधीलकी जोपासत सामाजिक कार्यात कार्यरत आहेत.तळागाळातील अडल्या नडल्यांची अडचणीला धाऊन जात मदत करतात.समाज उन्नती साठी सदैव तळमळीने काम करतात याच कारणामुळे मुंबई च्या पनवेल येथील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल महाविद्यालयाने अक्षय गवळी यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित केले.मला मिळालेल्या सन्मानामुळे माझ्या कार्याला बळ मिळाल्याचे अक्षय गवळी यांनी माध्यमांना सांगितले आहे.या कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक-अध्यक्ष श्री अंतेश नरसिंग गवळी सर, मानवी हक्क अभियानचे मुंबई प्रदेश अध्यक्ष कैलास भिसे, किशोर सूर्यवंशी (मानवी हक्क अभियान, मुंबई) प्राध्यापक संजय आढागळे अशोक शेजुळे पश्चिम उत्तर मुंबई मानवी हक्क अभियान जिल्हाध्यक्ष सह मान्यवर उपस्थित होते.

## आज पासून शृंगेरी देवी यात्रा उत्सवात सुरुवात

### पंधरा दिवस चालणार यात्रा उत्सव

आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील शृंगेरी देवी यात्रा उत्सवास आज दिनांक १३ जानेवारी पासून सुरुवात होत आहे हा उत्सव पंधरा दिवस चालतो तर १४ जानेवारी रोजी भव्य कुस्त्याचा जंगी हंगामा होणार आहे अशी माहिती शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आले आहे आष्टी तालुक्यातील ब्रह्म गाव येथील शृंगेरी देवी देवस्थान हे जागृत देवस्थान म्हणून राज्यभर ओळखले जाते देवस्थानावर वर्षभरात विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात यामध्ये नवरात्र उत्सव आणि पाऊस पौर्णिमेपासून सुरू होणाऱ्या यात्रा उत्सव हे दोन प्रमुख उत्सव साजरे होतात यावर्षी १३ जानेवारी पौष पौर्णिमा असल्याने दिनांक १३ जानेवारी यात्रा उत्सवावर सुरुवात होणार आहे



हा उत्सव पंधरा दिवस चालतो पौष अमावास्याला यात्रेची सांगता होईल दरम्यान पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये शृंगेरी देवी देवस्थानावर विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होत असतात यामध्ये १४ जानेवारी रोजी शृंगेरीदेवी देवस्थान येथे भव्य कुस्तीची दंगल होणार असल्याची माहिती शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आली आहे

## परवाण्याची मुदत संपलेल्या रास्त भाव दुकानदारांनी तात्काळ नुतनीकरण करुन घ्यावे , वैशाली पाटील



आष्टी ।प्रतिनिधी

तालुक्यातील सर्व रास्त भाव दुकानदारांना यांना आव्हान करण्यात येते की अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत अन्नधान्याची वाटप करण्यात येत असते यामध्ये असेल दर्शनास आले आहे की माहे डिसेंबर २०२४ मध्ये काही रास्ता भाव दुकानदार यांचे परवान यांची मुदत संपली आहे रास्त भाव दुकानदार यांचे परवाण्याची मुदत संपली ज्या आहे ज्या रास्त भाव दुकानदार यांचे नूतनीकरण करणे आहे त्यांनी तात्काळ तहसील कार्यालय अंतर्गत असलेल्या पुरवठा विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे माहे २०२५ पर्यंत जर असे परवाने नूतनीकरण केले नाही तर संबंधित रास्त भाव दुकानदार यांचे नियतन तात्पुरते स्वरूपात बंद केली जाईल आपले अधिनस्त असलेले लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहिले त्यास आपण स्वतः राहणार आहात याची नोंद घ्यावी यासाठी तात्काळ नूतनीकरण करून घेण्याचे आवाहन तहसीलदार वैशाली पाटील यांनी केली आहे

## तलाठी काजल ससाणे यांनी दिली नागापूर बुद्रुक येथे पिकपाहणी व इतर कामासाठी भेट

बीड।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या आदेशानुसार तसेच निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या सूचनेनुसार अतिवृष्टी २०२४ मध्ये झालेल्या नुकसान भरपाईचे अनुदानबाबत प्रक्रिया सुरु असून त्यासाठी आवश्यक ती माहिती भरून घेण्यासाठी मौजे नागापूर बुद्रुक येथे ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे यांनी गावातील खातेदारांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करून त्यांना विश्वासात घेऊन सर्व प्रकारची माहिती दिली . शेतकऱ्यांची यादी संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर शेतकऱ्यांना विशिष्ट क्रमांक म्हणजे व्हि के नंबर प्राप्त होतो . हा क्रमांक प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांनी जवळच्या महा-ई-सेवा केंद्र किंवा आपले सरकार केंद्रावर जाऊन आपापल्या बँक खात्याची ई केवायसी करून घ्यायची आहे , जेणेकरून त्यांना अनुदान मिळण्यास कोणतीही अडचण येणार नाही , असे त्यांनी यावेळी सांगितले .

शेतकरी स्तरावरील ई पीक पाहणी केल्यावर शेतकरी वर्ग घर बसल्या पीक पेरा ,विहीर , बोअरवेल च्या नोंदी करू शकतो , ई-पीक पाहणी ४ प्रकारचे लाभ देण्यासाठी वापरली जात असल्याचं ई-पीक पाहणी करताना त्यांनी माहिती दिली .

याविषयी बोलताना त्यानी सांगितले की १) चडझ मिळवण्यासाठी - तुम्हाला जर तुमचा शेतमाल किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत विक्री करायचा असेल तर त्यासाठीही तुमच्या संमतीनं हा डेटा वापरला जाऊ शकतो . २) पीक कर्जाच्या पडताळणीसाठी - तुम्ही ज्या पिकावर कर्ज घेतलंय , तेच पिक लावलं का , याची बँक हा डेटा पाहून पडताळणी करू शकते . १०० च्या वर बँका आजघडीला हा डेटा वापरत आहेत . ३) पीक विमा योजनेच्या लाभासाठी - विम्यासाठी अर्ज करताना नोंदवलेलं पीक आणि ई-पीक पाहणीत नोंदवलेलं पीक , यात तफावत आढळल्यास पीक पाहणीतील पीक अंतिम गृहित धरलं जात . ४) नुकसान भरपाईसाठी - नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचं नुकसान झाल्यास भरपाई देण्यासाठी ही माहिती वापरली जाते . ई पीक



पाहणी चे महत्व त्यांनी गावकऱ्यांना सविस्तर समजून सांगितले व काही ठिकाणी प्रात्यक्षिक ही करून दाखविले . तसेच गायरान जमीन , गाव स्वच्छता अभियान या नवीन उपक्रम सर्व जण मिळून राबविणार आहोत , यासाठी सरपंच सहित सर्व गावकरी व ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे यांनी सर्वांनी मिळून ही कामे करायची आहेत हे स्पष्ट केले . गावाचा विकास हे प्रथम कर्तव्य आपल्या सर्वांना आपल्या गावाप्रती निभवण्याचे नवीन वर्ष व मकर सक्रांतीच्या निमित्ताने संकल्प करून बरेच उपक्रम त्यांनी राबवण्यास सुरुवात केली आहे .त्याच बरोबर शाळा , अंगणवाडी , सामाजिक मंदिरे , मस्जिद , विहार स्वच्छ आणि सुंदर ठेवण्याचा सर्व गावांनी मिळून संकल्प केला आहे . त्यासाठी शक्य ती मदत ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे व तहसील कार्यालय बीड तसेच ग्राम पंचायत त्यांच्या सोबत असतील . गाव तिथे स्मशानभूमी हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आहे , ज्याचा उद्देश राज्यातील प्रत्येक गावात स्वतंत्र स्मशानभूमी किंवा दफनभूमीची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे . या उपक्रमाद्वारे, अंत्यसंस्कारासाठी आवश्यक जागेची कमतरता दूर करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे . या योजनेअंतर्गत , ज्या गावांमध्ये स्मशानभूमी किंवा दफनभूमीची सुविधा नाही , तिथे गायरान जमीन वाटप करून स्मशानभूमी केली जाते . या उपक्रमामुळे गावांमध्ये अंत्यसंस्कारासाठी आवश्यक जागेची उपलब्धता सुनिश्चित होईल , तसेच मृतदेहांच्या योग्य अंत्यसंस्काराची व्यवस्था होईल . यामुळे सामाजिक सलोखा राखण्यास मदत होईल आणि अंत्यसंस्कार प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर होतील .

महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील ग्रामीण भागात अंत्यसंस्काराच्या सुविधांची उपलब्धता वाढेल आणि नागरिकांना या सुविधांचा लाभ घेता येईल . स्मशानभूमी साठी जागा बघून ग्राम पंचायत स्तरावरील ठराव मांडण्याचा व ग्राम महसूल अधिकारी स्तरावरील अहवाल सादर करण्यासाठी काजल ससाणे ( ग्राम महसूल अधिकारी ) यांनी पंचनामा करून घेतला. ग्राम महसूल अधिकारी स्तरावरील जे प्रकरण येतील त्या सर्व प्रकरणात ग्राम महसूल अधिकारी व महसूल विभाग शेतकऱ्यांसोबत आहे याची शाश्वती त्यांनी यावेळी गावकऱ्यांना दिली .

## नेत्रदीपक वातावरणात थलेटिक्स स्पर्धेने झाला क्रीडा महोत्सवाचा समारोप

प्रकाश झोतात खेळले गेले अंतिम सामने

गेवराई (प्रतिनिधी)

शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या नेतृत्वाखाली जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सुरु असलेल्या क्रिडा महोत्सवाचा समारोप शिवशारदा पब्लिक स्कूलच्या भव्य मैदानावर थलेटिक्सच्या अंतिम सामन्याने करण्यात आला. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात, जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंग पवार पंडित, गेवराई बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, गेवराई पोलीस स्टेशनचे पोलीस सहाय्यक निरीक्षक संतोष जंजाळ, जयभवानी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर दत्तात्रय टेकाळे, युवानेते पृथ्वीराज पंडित, शिवशारदा मल्टिस्टेटचे सरव्यवस्थापक रणजित पंडित, प्राचार्या श्रीमती शिल्पा क्षिरसागर, बीट अंमलदार अशोक हंबलडे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. प्रकाश झोतात आणि नेत्रदीपक कार्यक्रमात क्रिडा महोत्सवाचा समारोप करण्यात आला. यावेळी थलेटिक्स स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर क्रीडा ज्योत प्रज्वलीत करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी बोलताना जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात म्हणाले की, रणवीर पंडित यांनी आपल्या नियोजनबद्ध आयोजनातून क्रीडा महोत्सव यशस्वी केला असून त्यांनी गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने हा महोत्सव घेत असल्याने गेवराई तालुका क्रीडामय झाला आहे. भविष्यात गेवराई तालुका खेळाडूंचा तालुका म्हणून ओळखला जाईल.

पुढच्या क्रीडा महोत्सवात कॅरम स्पर्धा आयोजित करणार---रणवीर पंडित

आपल्या प्रास्ताविक भाषणात बोलताना क्रीडा महोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित म्हणाले की, यावर्षीच्या क्रीडा महोत्सवात गुणवत्ता पहायला मिळाली. ग्रामीण भागातील मुली आणि मुलांनी अतिशय सुंदर पद्धतीने आपला क्रिडा आविष्कार दाखवला. पुढच्या वर्षीच्या क्रिडा महोत्सवात कॅरम




स्पर्धा घेण्यात येतील. क्रीडा शिक्षक व विद्यार्थी खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीने स्पर्धांची उंची वाढली आहे असेही ते म्हणाले.

ग्रामीण भागातील खेळाडू संधीचे सोने करतील ----दत्तात्रय टेकाळे

रणवीर पंडित यांनी घेतलेला क्रीडा महोत्सवामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाली आहे. हे खेळाडू मिळालेल्या संधीचे सोने करतील. क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थी शारीरिक आणि मानसिक सक्षम होतील. त्यांची उत्तम जडणघडण होत आहे. पुणे मुंबई सारखे वातावरण रणवीर पंडित यांनी निर्माण केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खुप चांगला फायदा होत आहे. शिवाजीराव पंडित परिवाराने शिक्षण, सहकार, क्रीडा आदी क्षेत्रा भरीव काम केले असून त्याचा फायदा सर्वांना होत असून येणाऱ्या काळात राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर आपले हेच विद्यार्थी चमकतील असेही ते म्हणाले.

आव्हानांचा मुकाबला करण्याचे सामर्थ्य खेळातून मिळते--- संतोष जंजाळ

आपल्या भाषणात बोलताना संतोष जंजाळ म्हणाले की, रणवीर पंडित यांनी अतिशय सुंदर पद्धतीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने आयोजित केलेला क्रीडा महोत्सव यशस्वी झाला आहे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात करिअर केले पाहिजे. पालकांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासाठी वेळ दिला पाहिजे. आपल्या कलागुणांचा आविष्कार करा. निरोगी शरिरात निरोगी मन काम करत असते. भविष्यात येणाऱ्या आव्हानाला तोंड देण्याचे सामर्थ्य आपल्याला खेळातून मिळत असते. रणवीर पंडित यांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण प्रामाणिकपणे मेहनत करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून उल्लेखनीय काम होत आहे--- मुजीब पठाण

यावेळी बोलताना सभापती मुजीब पठाण म्हणाले की, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम रणवीर पंडित यांच्या माध्यमातून होत आहे. शिवछत्र परिवाराची तिसरी पिढी रणवीर पंडित यांच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात उतरली आहे. सामान्यांची लेकरं यानिमित्ताने खेळामध्ये चमकत असल्याचा आम्हाला अभिमान वाटतो असेही ते यावेळी म्हणाले.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT